# सरवर कृष्णासमान.... !! 𝄞𝄞𝄞

'ये विविध भारती की विग्यापन प्रसारण सेवा है !!' हे प्रांजळ वाक्य अलीकडे ऐकू येत नाही. त्या मागोमाग लागणाऱ्या रब रब रब रब रबेक्स, दातो और मसुडो को धो डालनेवाला डाबर का लाल दंतमंजन, प्रकाशचं माक्याचं आयुर्वेदिक तेल, हिरो मॅजेस्टिक मोपेड, हमाssरा बजाज वगैरे जाहिराती पण आता ऐकू येत नाहीत. कारण रेडिओ आता विस्मृतीत गेला आहे. नाही म्हणायला अमीन सयानीचे 'बिनाका गीतमाला', कामगारसभेची रेडिओवरील ट्यून, दूरदर्शनची ट्यून  वगैरे व्हाट्सअपवर पोस्ट करून सामुदायिकपणे डोळ्यांतून टिपे गाळून नॉस्टाल्जिक हळहळ व्यक्त करण्याचा कार्यक्रम अधूनमधून होत असतो. आता आकाशवाणीच्या मराठी चॅनेलचे नांव 'अस्मिता' ठेवले असले, तरी मराठी रसिकांची रेडिओविषयीची 'अस्मिता' किंवा तळमळ केव्हाच लोप  पावली आहे. "कालाय तस्मै नम:" हेच खरं !! अर्थात हे एकेकाळी ६० पैशांत मसाला डोसा खाणाऱ्या पन्नाशीच्या वरच्या पिढीबद्दल  मी बोलतोय. (नवीन पिढीला तर हे काही माहीतच नाही. कारण जन्माला येतानाच ते मोबाईल हातात घेऊन आलेत. रेडिओ, पेजर, टेप रेकॉर्डर, Floppy आणि ट्रान्सिस्टर बघायला त्यांना कदाचित राजा केळकर वस्तुसंग्रहालयात जावं लागेल ).

ते कशाला, अगदी आत्ता-आत्तापर्यंत आम्ही महाराष्ट्र टाइम्सच्या फ्रंटपेजची मजा चाखत होतो. तीही आताशा मिळेनाशी झालेय. पूर्वी आमची दिवसाची सुरुवात 'मंगलप्रभात' ने व्हायची; अलीकडे ती 'मंगलप्रभात लोढा'ने होते.  फ्रंट पेजवर 'लोढामध्ये तुम्ही फ्लॅट घेतल्यास कुटुंबशैलीची मजा तुम्ही कशी चाखू शकता', याची अक्षयकुमारने केलेली संपूर्ण पानभर ॲड बघावी लागते. आतले दुसरे पान ( म्हणजे पूर्वाश्रमीचे पहिले पान !😀) उघडेपर्यंत हेडलाईन वाचायला ताणली गेलेली आपली उत्सुकता बऱ्यापैकी विरलेली असते. त्यावर उपाय म्हणून मी वाफाळलेल्या चहाचा एक घोट घेतो. अगदी 'आदत से मजबूर' म्हणून पहिले पान उलगडून आतल्या पेजवरची आपण हेड-लाईन वाचतो. पण हेडलाईन्सचे स्वरूप बदललेले असते. आता इथे निरव मोदीची 'निरवानिरव' किंवा विजय मल्ल्याचे लोकार्पण का प्रत्यार्पण, इस्राएलने पॅलेस्टाईन विरुद्ध संगिनी रोखल्याचे चित्र, वगैरे बातम्या असतात. किंवा निर्मलाताईंनी आपल्यासारख्यांना वाचताही येणार नाही इतकी शून्ये असलेली 'रक्कम' बँकांना रिलीफ पॅकेज म्हणून दिलेली असते. सगळे जग म्हणजे एक 'बिझिनेस' झाल्याचा हा परिणाम !!  जीवनातली साधी साधी 'सुखं' सुद्धा आपल्याला 'डिजिटल-कम-जाहिरात' युगातील विश्व-यज्ञामध्ये समिधांसारखी त्यागावी लागतात. हे त्यागण्याची तयारी नसणाऱ्यांना 'प्रतिगामी' किंवा 'आऊट-डेटेड' म्हणून लेबल लावले जाते. पण तुम्ही डिजिटल युगावर प्रेम करत असाल, तर मात्र असली दुःखे कुरवाळण्याची तुम्हाला गरज पडत नाही.....  ( OLD SAYING: When in Rome, do as Romans do..!!)..

पूर्ण लेख वाचण्यासाठी खालील लिंक क्लिक करा 👇
https://vikaskatre.blogspot.com/2021/09/blog-post.html

**विकास कात्रे**